असा. क्र. २ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी ४, २००५/पौष १४, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.—**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . | पृष्ठे ४-६ |

दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९६२ चा महा. ५. २००४ चा महा. अध्या. २५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २१ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २१ ऑगस्ट २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम २५७ क समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २५७ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-- १९६२ चा महा. ५

गटाची किंवा गटांची विभागणी आणि तिचे परिणाम.

**"२५७ क.** (१) कोणत्याही विद्यमान पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीमध्ये, राज्य शासनाने, कलम २५६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) व कलम ५ अन्वये, एखाद्या किंवा अनेक गटांची विभागणी करून त्या गटाच्या किंवा गटांच्या जागी दोन किंवा अधिक गटांची रचना करणारी अधिसूचना काढली असेल आणि अशा नवीन गटाची किंवा यथास्थिति गटांची रचना केल्याच्या परिणामी, कलम २५७ च्या खंड (दोन) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, वगळलेल्या क्षेत्राचे वा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, विद्यमान पंचायत समितीच्या अथवा समित्यांच्या सदस्यांना काढून टाकणे आवश्यक असेल आणि कलम ५६ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, यथास्थिति, नवीन पंचायत समिती अथवा समित्या स्थापन करणे आवश्यक असेल त्या बाबतीत, या अधिनियमाच्या कलम २५७ मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी,—

(क) कलम २५६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे, यथास्थिति, विद्यमान गटातून किंवा गटांतून अशाप्रकारे वगळलेले वा वगळलेली आणि नवीन गटाची किंवा गटांची रचना करीत असल्याचे अधिसूचित केलेले वा केलेली, क्षेत्र वा क्षेत्रे, कलम ५६ अन्वये, अशा गटासाठी किंवा गटांसाठी नवीन पंचायत समिती किंवा समित्या म्हणून स्थापन केल्याचे मानण्यात येईल ;

(ख) विद्यमान गटातून किंवा गटांतून वगळलेल्या क्षेत्राचे वा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे आणि कलम २५७ च्या खंड (दोन) अन्वये अशाप्रकारे काढून टाकलेले सदस्य हे, अशा नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीचे किंवा यथास्थिति समित्यांचे निर्वाचित सदस्य असल्याचे मानण्यात येईल आणि हे सदस्य, या अधिनियमाच्या अनुक्रमे कलम ६७ व कलम ६८ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, आपल्यामधूनच आपला सभापती आणि उप सभापती निवडतील ;

(ग) खंड (क) अन्वये नवीन पंचायत समिती किंवा समित्या स्थापन झाल्यावर, राज्य शासन, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, विद्यमान पंचायत समितीच्या किंवा समित्यांच्या हक्कांचे व दायित्वांचे, नव्याने स्थापन झालेल्या उत्तराधिकारी पंचायत समितीकडे किंवा, यथास्थिति समित्यांकडे, पूर्णतः वा अंशतः हस्तांतरण करण्याची आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्तींची, तसेच कलम २५६ अन्वये काढलेली अधिसूचना अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर आनुषंगिक, परिणामरूप व पूरक बाबींची तरतूद करील ; आणि

(घ) पंचायत समित्यांच्या बाबतीतील, या अधिनियमाच्या सर्व संबद्ध तरतुदी, अशा नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीला किंवा समित्यांना लागू असतील.

(२) नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीचा आणि तिच्या सदस्यांचा पदावधी हा, ज्या पंचायत समितीची विभागणी करून नवीन पंचायत समिती स्थापन केली असेल त्या विद्यमान पंचायत समितीबरोबर एकाच वेळी समाप्त होईल.''.

२००४ चा महा. अध्या. २५. ३. (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. २५ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह), या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीन्वये करण्यात आलेली कृती किंवा, यथास्थिती, कार्यवाही, किंवा काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई